NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक ०८.११.२०२६ रविवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक ०७.११.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ११ केसेसमध्ये ११ ईसमावर कारवाई करून एकुण १६,१७०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, जुगार कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये २० ईसमावर कारवाई करून एकुण ८३,८५०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये २५ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ५७ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १२७ मोवाका अन्वये ६४ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २३६ केसेस, रॉंग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ६२ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ३७ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०७ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ११८ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०२ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २४ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०८ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,०२७ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४(सि) अन्वये २० केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १४ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,७८४ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ४,२४,५००/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे अंबाझरी :– शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक ०८.११.२०२६ चे ०१.४२ वा. चे सुमारास, अंबाझरी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, सुदामनगरी येथे एक इसम शस्त्रासह फिरत आहे. अशा माहितीवरुन, नमुद ठिकाणी गेले असता, विघ्नहर्ता नावाचे घरासमोर, सार्वजनिक रोडवर प्राप्त वर्णनाचा इसम दिसुन आला. त्याचेजवळ तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अमन रमेश येरपुडे वय ३० वर्षे रा. संघदीप बुध्द विहारजवळ, सुदामनगरी, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्या नेसते पॅन्टचे मागील

बाजुस एक लोखंडी फोल्डींगवाला हत्तीमार चाकु किंमती २००/— रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे अंबाझरी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे मानकापुर :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

फिर्यादी धिरज त्रिवेदीप्रसाद पांडे वय ३१ वर्षे, रा. चन्नु मिश्रा यांचे घरी, प्रशांत किराणा स्टोअर्सजवळ, गोरेवाडा, मानकापुर, नागपूर हे पुजारी आहेत. यातील आरोपी श्याम रमेश सोलंकी वय ३२ वर्ष रा. इंदोर, मध्यप्रदेश याने दिनांक ०४.११.२०२६ चे १०.३० ते ०१.११.२०२६ चे १०३० वा. चे दरम्यान, फिर्यादीजवळ येऊन, आरोपीस मुलबाळ नसल्याने त्याला घरी पुजा करावयाची आहे असे सांगुन फिर्यादीचा विश्वास संपादन केला. आरोपीने फिर्यादीस विश्वासात घेऊन, मला खोदकामात सोन्याची माळ सापडलेली आहे. ती सोनाराकडुन चेक करुन घ्या व माझे बहिणीचे लग्न असल्याने मला त्याकरीता पैसे द्या असे म्हणुन, आरोपीने त्याचेजवळील माळेमधील एक मणी काढुन फिर्यादीस चेक करण्याकरीता दिला. फिर्यादीने तो मणी चेक केला असता सोन्याचा निघाला. फिर्यादीचा विश्वास बसल्याने, फिर्यादीने आरोपीस ४५,०००/— रु. दिले. नंतर फिर्यादीने ती माळ चेक केली असता, ती माळ बनावटी निघाली. आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करुन, बनावटी सोन्याची माळ खरी आहे असे सांगुन, फिर्यादीकडुन ४५,०००/— रु. घेऊन फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे पोहवा परसराम मानकर ७५०७४२६८२७ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१८(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे वाडी :— दिनांक ०१.११.२०२६ चे ०२.०० ते ०२.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी काव्य सुनिल शेलारे वय २२ वर्ष रा. वार्ड क्र. १, इंदीरा नगर, घर क्र. ५६०८, खडगाव रोड, वाडी, नागपूर यांचे वडील नामे सुनिल श्यामरावजी शेलारे वय ५३ वर्ष हे पोलीस ठाणे वाडी हद्दीत राहणारी त्यांची बहिण नामे श्रीमती वनिता धीरज थुल रा. स्मृती ले आऊट, प्लॉट क्र. ५५अ, खडगाव रोड, नागपूर यांचे घरी दिवाळीनिमीत्त रंगरंगोटीचे काम करायला गेले असता, रंगकाम करतांना घराचे सज्ज्यावर चढत असतांना, पाय घसरुन खाली डोक्याचे भारावर पडल्याने बेशुध्द झाले. त्यांना उपचाराकरीता आधी लक्ष्य मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व नंतर लता मंगेशकर हॉस्पिटल, हिंगणा येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक ०७.११.२०२६ चे १९.४० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. उत्तम जायभाये यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.